# बँकिंग, तंत्रज्ञानातील दिग्गज प्रसन्ना लोहार 'मोरिंगा टेकसॉल्व्ह'च्या सल्लागारपदी नियुक्त



**पुणे :** बँकिंग क्षेत्रासाठी सॉफ्टवेअरमधील उत्पादने व सेवा पुरविणाऱ्या, तसेच नियामक तंत्रज्ञान (रेगटेक) क्षेत्रात पारितोषिक विजेती कामगिरी करणाऱ्या मोरिंगा टेकसॉल्व्ह या आघाडीच्या कंपनीने आपल्या सल्लागार मंडळाच्या सदस्यपदी बँकिंग व तंत्रज्ञान उद्योगातील दिग्गज प्रसन्ना लोहार यांना नियुक्त केले आहे. कंपनीने बुधवारी ही घोषणा केली.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), बिग डेटा, रोबोटिक प्रक्रिया ऑटोमेशन (आरपीए), तसेच डेव्हऑप्स, एंटरप्राइझ आर्किटेक्चर व एपीआय बँकिंग यांचा समावेश असलेल्या क्लाऊड तंत्रज्ञानात प्रसन्ना लोहार यांना समृद्ध अनुभव आहे. बँकिंग, ब्लॉकचेन डिजिटल चलन, नियामक अनुपालन, सायबर सुरक्षा आणि फसवणूक जोखीम व्यवस्थापन यांमध्ये लोहार अतिकुशल आहेत. सध्या ते ब्लॉक स्टॅक येथे सध्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करीत आहेत. तेथे ते वेब ३.० साठी अत्याधुनिक स्वरुपाचे बँकिंग प्लॅटफॉर्म बनवीत आहेत. भारतात ब्लॉकचेन तंत्रज्ञानाला गती देण्यासाठी त्यांनी इंडिया ब्लॉकचेन फोरमची स्थापना केली आहे. विविध संस्थांनी त्यांचा 'टॉप ५० सीआयओ', 'टॉप बीएफएसआय इनोव्हेट'र, 'टॉप १०० सिक्युरिटी इन्फ्लुएंट'र आणि 'टॉप ५० पेमेंट लीडर' असे उल्लेख करून त्यांना गौरविले आहे.

'मोरिंगा टेकसॉल्व्ह'चे संस्थापक व सीईओ संजीव दहिवाडकर म्हणाले, वित्तपुरवठा व तंत्रज्ञान यासंबंधीच्या क्षेत्रात मोरिंगाने अत्याधुनिक नवकल्पना आणल्या आहेत. बँकिंग, वित्त व विमा यांतील कंपन्यांनी त्या मोठ्या प्रमाणावर स्वीकारल्या आहेत. प्रसन्ना लोहार यांच्या समावेशामुळे आम्हाला या कामात मोठे बळ मिळणार आहे.

प्रसन्न लोहार म्हणाले, रेगटेक क्षेत्रातील अनेक गंभीर समस्यांचे निराकरण करण्यात मोरिंगा आघाडीवर आहे. येत्या काळात नियामक तंत्रज्ञान क्षेत्रात 'मोरिंगा'मुळे नाविन्यपूर्णतेला गती देईल, याची मला खात्री आहे. त्यामध्ये मी 'मोरिंगा'समवेत काम करणार आहे.


**पिपरी -चिंचवड विभाग**

**सा. क्रांतीतेज संपर्क कार्यालय**

बातमी, लेख, जाहिरात, कविता विभांगातील तक्रारीसाठी

संपर्क :- नारायण भालेराव रेल्वेलाईन, बापूकाटेची चाळ वार्ड नं. ३ दापोडी पुणे-४११०१२

मो. नं. ७२४९१८४९६६१, ९४२२५४९६६१